**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र राज्य)
website: http://su.digitaluniversity.ac
Fax : 91-0217-2744777

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accreditation-2015
'B' Grade (CGPA- 2.62)

**SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR**
Solapur - Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-122
Email : bcud@sus.ac.in
bcudaffiliation@sus.ac.in


**जा.क्र. सोविसो/मविविमं/संलग्नता/** ८७४३ दिनांक: 21 SEP 2016

**प्रति,**
**मा. प्राचार्य/अध्यक्ष/ सचिव**
**संलग्नित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये**
**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**विषय :- महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा बायोमेट्रिक हजेरी अहवाल सादर करण्याबाबत..**
**संदर्भ :-** या कार्यालयाचे परिपत्रक क्रं सोविसो/मविविमं/ॲफि/२०३४ दि.१३.०६.२०११

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून शै. वर्ष २०११-१२ पासून आपल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या हजेरीस्तव बायोमेट्रिक मशिन महावद्यिालयात बसविणे विद्यापीठ अधिकार मंडळाने बंधनकारक केलेले असल्याचे व बायोमेट्रिक मशिनव्दारे महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची हजेरी दररोज घेणे आवश्यक असल्याचे कळविण्यात आले होते.

तसेच जी महाविद्यालये उपरोक्त संदर्भिय परिपत्रकानुसार कार्यवाही करुन अहवाल सादर करणार नाहीत अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आर्थिक व शैक्षणिक नुकसानीस सर्वस्वी संस्था / महाविद्यालयच जबाबदार असेल असेही सदर परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते.

परंतू ज्यावेळी विद्यार्थ्यांचे इतर शाळेवर सराव पाठ असतात त्यावेळी उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी घेणे महाविद्यालयांना व विद्यार्थ्यांना त्रासदायक व खर्चिक होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास येत आहे. त्यास्तव सदर पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की ज्यावेळी विद्यार्थ्यांचे इतर शाळेवर सरावपाठ असतात त्या दिवशी त्यांच्या बायोमेट्रिक हजेरीची आवश्यकता नाही. तथापि प्राचार्यानी दर महिन्याचा बायोमेट्रिक अहवाल पाठवताना तसे प्रमाणित करुन दयावे व तसेच सरावपाठाचे वेळापत्रक हजेरी अहवालासोबत सादर करावे.

या पत्रान्वये आपणास पुनःश्च कळविण्यात येते की, प्रत्येक महिन्याचा बायोमेट्रिक विद्यार्थी हजेरी अहवाल महिना समाप्तीनंतर पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत सादर करावा.

**आपला विश्वासु**

**संचालक**
**महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ**